वर्तमानाची लख्ख जाणीव

■ श्रीकांत बोजेवार

मानवी भावभावना, नातेसंबंध आणि त्यातली गुंतागुंत शतकानुशतके तीच असली तरीही काळ बदलतो तसे त्यांचे संदर्भ,स्वरूप आणि कारणमीमांसा बदलत असते. या ब दलांचे आणि काळाच्या ओघात तयार झालेल्या नव्या भाषेचे, संकल्पनांचे प्रतिबिंब ज्यांच्या साहित्यात उमटते असे जे लेखक गेल्या चार-पाच वर्षांत समोर आले आहेत, त्यात गणेश मतकरी हे नाव थोडे अधिकच वेगळे आहे. ते अशासाठी की, रचनाबंध म्हणून त्यांच्या कथांवर पारंपरिक मराठी कथांची छाप नाही. सर्वसाधारण मराठी कथालेखनात निवेदक म्हणून लेखकांची जी मध्यमवर्गीय ललितवृत्ती दिसून येते, ती मतकरी आवश्यक तेव्हा सहजगत्या बाजूला ठेवतात आणि इंग्रजी शब्दांचा तुलनेने सढळ वापर करतात, मात्र त्याबद्दलचा अपराधबोध त्यांच्या कथालेखनात दिसत नाही. भावनात्मक नाट्य रंगवताना त्यात उपमा, अलंकाराचा सोस नसतो, उलट काहीसा कोरडा तटस्थपणाच जाणवतो. 'इन्स्टॉलेशन' हा त्यांचा कथासंग्रह वाचताना ही वैशिष्ट्ये ठसठशीतपणे समोर येतात.

एखाद्या कथासंग्रहातील कथा सलग वाचल्यावर अनेकदा विषयांच्या अनुषंगाने त्यांत एखादे सूत्र असते, अनेकदा ते जाणीवपूर्वकही असते. 'इन्स्टॉलेशन'मध्ये सूत्र असलेच तर ते लेखकाच्या शैलीचे आहे आणि या सर्व कथा आजच्या काळात, तुम्ही-आम्ही जगतो आहोत त्या काळातल्या असल्याच्या लख्ख जाणिवेचे आहे. सिनेमा माध्यमाशी जवळीक असणारे लेखक तपशीलासह दृश्य उभे करण्याला महत्त्व देतात ते सिनेमाच्या संस्कारांमुळे. मतकरींच्या कथालेखनावर उत्कंठावर्धक सुरूवात, शेवटाचा अदमास येणार नाही असा मध्य आणि एक प्रकारचा सौम्य अथवा तीव्र धक्का देणारा शेवट असाही सिनेमा माध्यमाचा प्रभाव दिसतो. पहिल्या 'इन्स्टॉलेशन' या कथेपासूनच त्याचा प्रत्यय येतो.

कथानक सांगण्यापेक्षाही मनोव्यापार, मनोवृत्ती, प्रवृत्ती आणि परिस्थिती सांगण्याकडे या बहुतांश कथांचा कल आहे. त्यामुळे व्यक्तिरेखांचे संवाद कमी आणि प्रथम पुरूषी निवेदन तुलनेने अधिक आहे. कथासंग्रहाचे शीर्षक म्हणून आलेली 'इन्स्टॉलेशन' ही कथा संग्रहातली सर्वोत्तम कथा आहे. कथासंग्रहाच्या सुरूवातीला लेखकानं 'द कॅचर इन द राय' या कादंबरीमधलं एक कोटेशन दिलेलं आहे. या कादंबरीप्रमाणेच संग्रहातील कथा निरागसता, आत्मशोध, काहीतरी हरवल्याची भावना, तुटत चाललेले दुवे यांचा वर्तमानाच्या संदर्भात शोध घेताना दिसतात. पहिली कथा हा या सर्व गुणविशेषांचा अत्युत्तम मेळ आहे. पारंपरिक कथा वाचणारांना या कथेला कथा का म्हणावे असाही कदाचित प्रश्न पडू शकतो. अनेकदा इतरांशी झालेल्या संवादापेक्षा एखादी व्यक्ती स्वत:शी जो संवाद करते त्यात अधिक नाट्य असते. 'इन्स्टॉलेशन' ही कथा लिहिताना याचा वापर केलेला आहे. गूढकथेच्या शैलीत लिहिली गेलेली ही कथा स्वाभाविक मानवी वळण घेत संपते, तेव्हा आपण आपल्या भवतालाकडे वेगळ्या नजरेने पाहू लागतो. या खालोखाल लक्षात राहते ती 'घाई' या शीर्षकाची कथा. या कथेतही मुख्य व्यक्तिरेखेचं आयुष्य, त्याच्याशी संबंधित व्यक्ती यांची माहिती बरीचशी निवेदनातून अथवा मुख्य व्यक्तिरेखेच्या मनातील विचारांमधून वाचकाला कळते. मात्र संपूर्ण कथा म्हणजे एका कारचा प्रवास असल्याने कथानायक कार चालवत असताना वाचकही कथानक आणि त्याचे आयुष्य अशा दुहेरी मार्गाने सोबत प्रवास करत राहतो. ज्या वाचकांनी स्पीलबर्गची 'ड्यूएल' ही फिल्म पाहिली असेल त्याला कदाचित ही कथा अधिक थरारक वाटेल. कारण ही कथा वाचताना डोक्यांत त्या चित्रपटाचाही स्वतंत्ररीत्या प्रवास सुरू राहतो आणि त्यामुळे अधिक मजा येते.

कथानकातील व्यक्तिरेखा ज्या व्यवसायातील आहेत, त्या व्यवसायाशी संबधित शब्दांचा वापर करून वातावरण निर्मिती करण्यासाठी लेखकाने त्याला परिचित असलेल्या क्षेत्रांवर भर दिलाय असे म्हणता येते, किंवा लेखक स्वाभाविकपणे आपल्या परिचयाच्या परिघात आशय शोधत असतो, असेही म्हणता येईल. दहा कथांचा समावेश असलेल्या या संग्रहातील सर्वच कथा या उंचीच्या नाहीत किंवा सारख्या उंचीच्या नाहीत. उदाहरणार्थ 'क्रांती' ही कथा फसलेली आहे, कारण त्यातून काय सांगायचे आहे याबाबत लेखक संभ्रमात दिसतो, तर 'पास्ट' ही कथा उत्तम वातावरण निर्मितीनंतर काही विशेष न घडताच संपते. ती कथा कमी आणि ललित लेख जास्त वाटते. तरूणपणी अकस्मात अपघातात गेलेल्या प्रियंका डहाळेला हा संग्रह तिच्या पश्चात अर्पण केलेला आहे (त्याला लेखक इन अब्सेन्शिआ म्हणतो). चटका लावून गेलेल्या या अपघातानंतर कदाचित तिच्याशी आधी झालेला संवाद, तिच्या व्यक्तिमत्त्वातले काही पैलू आठवून ही इम्प्रेशन्स आकाराला आलेली असावीत, परंतु ती कथा म्हणून आकार घेत नाही. 'शूट', 'वाट' या कथा उत्तम आहेत. 'शूट' ही कुठल्याही काळात घडू शकेल अशी तर 'वाट' ही कॉर्पोरेट क्षेत्रातील रक्तहीन क्रौर्याची आजच्या काळातली कथा आहे. पुन्हा एकदा प्रथमपुरुषी निवेदनातून उगलडणारी आणि काहीशी आत्मचरित्रात्मक वाटावी अशी 'ट्रॉमा' ही कथा या संग्रहाचा शेवट करते. वर्तमानाचे हे 'इन्स्टॉलेशन' नव्या कथालेखनाबद्दल, लेखकाबद्दलचा विश्वास सार्थ असल्याची खात्री पटवणारे आहे.

इन्स्टॉलेशन (कथासंग्रह)
लेखक : गणेश मतकरी
मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी
प्रकाशक : मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई
पृष्ठं :१६८ **किंमत :** २२० रु.

काटेरी वास्तव आणि आश्वासक दिलासा

■ सदानंद डबीर

'काटेसावर' हा ज्येष्ठ कवयित्री उषा मेहतांचा सहावा काव्यसंग्रह. गेली पस्तीस वर्षांहून अधिक काळ त्या कविता लिहिताहेत. साहजिकच त्यांची कविता प्रगल्भ होत गेली आहे, तरीही ती क्लिष्ट किंवा दुर्बोध न होता, 'प्रासादिक सहजाविष्कार' - अशीच आहे. 'काटेसावर'मध्ये एकूण बासष्ट कविता आहेत, नि विजया राजाध्यक्षांची छोटेखानी पण मर्मग्राही प्रस्तावनाही आहे.

सामाजिक वास्तवाला भिडणाऱ्या कविता हा एक रंग आहे. पहिल्याच कवितेत, कवयित्री वयोपरत्वे आलेली परिपक्वता नमूद करते - 'जखमा आता भरून आल्या / व्रणही नाहीसे झालेत / शांत, स्वच्छ श्वास घेता येतोय / खिल्लीदार विण माखलेले लेखणीचे वार / सहज झेलता येतात आता हसण्यावारी...' तर 'हपापांची वंशावळ'मध्ये, त्या भ्रष्ट-धनदांडग्यांना सवाल करतात - 'किती खाल... फुटत कशी नाहीत अजून यांची पोटं / किती पिढ्यांची चैनबाजीची सोय करून...' सामान्य माणसाची चीड इथे व्यक्त होते.

सामाजिक कवितांमध्ये पर्यावरणाचाही एक रंग आहे. 'एक लहानसे तळे', 'कडक रूसलीय सृष्टी' इत्यादी कवितांमधून तो शब्दबद्ध होतो. तळं नाहीसं होतं. जंगल भुईसपाट करून त्याच्या छाताडावर नव्या वस्त्या होतात. हजारो पाखरं - 'निष्प्राण होऊन निर्माल्य' होतात. कवयित्री हे काटेरी वास्तव समोर ठेवते, आणि कुठलीही टिप्पणी न करता आपल्याला अस्वस्थ करते.

सामाजिक आशयाच्या कवितांना एक विलोभनीय पदर आहे तो अलीकडे कवितांमधून लुप्त झालेल्या 'व्यक्तिचित्रण' या प्रकाराचा. 'दंगल' या कवितेत चाकूसुऱ्यांना धार लावून देणाऱ्या धारवाल्याचे चित्रण येते. हे शब्दचित्र दंगलीत झालेल्या त्याच्या मृत्यूने चटका लावून जाते.

'कोण लागते ती माझी' या कवितेत फूटपाथवरची शून्य भकास डोळ्यांची बाई भेटते. 'मुलगी' या कवितेत गावाकडून आलेली, घरकाम करणारी... 'न हसणारी, न फुलणारी' मुलगी भेटते. 'तरुण' कवितेत रद्दी न्यायला येणारा - 'बी.कॉम' झालेला, परिस्थितीने गांजलेला मुलगा भेटतो. तर - 'त्या प्रवासात' या कवितेत, प्रवासात भेटलेली एक निरागस बालिका, कवयित्रीला - 'नानीजी हैं न आप मेरी?' असा व्याकूळ करणारा प्रश्न विचारते.

'एक स्मरणसहल' या दीर्घ कवितेत (दिवंगत) माधव मनोहरांचे व्यक्तिचित्रण व आठवणी येतात. ज्यांनी माधव मनोहरांना, पाहिलं/ऐकलं आहे - त्या पिढीला ही कविता प्रत्ययकारी वाटेल.

'थांबू नकोस मेधाविनी' या कवितेत स्त्री-शक्तीला आवाहन आहे. अजून बराच प्रवास करायचाय् ही जाणीव आहे. भूतकाळाची कटू आठवण आहे, वर्तमानाचे विषण्ण चित्रण आहे. तरीही... 'चिवटचणीच्या आहोत आपण / द्वेष न करता मिळवू आपण बाईचं माणूसपण / जे रास्त हक्काचं ते मिळवायलाच हवं मेधाविनी...' हे आवाहन आधुनिक स्त्रीच्या बुद्धिमत्तेला आहे, म्हणून 'मेधाविनी' हे संबोधन आहे.

एकाकी वृद्ध व्यक्तीच्या, थोड्याशा व्यक्तिगत अनुभवाच्या म्हणता येतील अशाही कविता आहेत. त्यामध्ये त्या/त्या वेळेचा मूड साकार होतो. कधी तो परस्परविरोधीही असू शकतो. उदा. 'दु: खी - बि: खी' या कवितेत कवयित्री म्हणते - 'मी नाहीय् तशी दु:खी-बि:खी / तसं तर खटकत असतंच थोडंफार... काय असतं हो दु:ख म्हणजे / नेमकं असतं तरी काय?' ती कशी मजेत आयुष्य जगतेय् हे सांगता सांगता, कवितेचा सांधा बदलतो, 'पण अलीकडे झोपेत म्हणे मी विव्हळायला लागले आहे' - या ओळीने. आणि आनंदी असणं हे किती वरवरचं, कृतक आहे हे जाणवून वाचक अंतर्मुख होतो.

या सगळ्या सामाजिकतेत काही तरल निसर्गचित्रणही आहे. उदा. 'दरी' या कवितेतल्या ओळी - 'ओढून घेते ती चेहऱ्यावरून / उदासीची हलकीशी ओढणी / हळूहळू / होऊन जातं सर्वत्र / धुकं... धुकं... धुकं' मग हळदिवं ऊन बागडतं आणि दरीतून मंद गुणगुण देखील येऊ लागते!

'चल निघायचंय आता...' या कवितेत मरणभयाची तरल चाहूल शब्दबद्ध झाली आहे. ज्येष्ठ नागरिकांचं मनोगतही एका कवितेत येते.

'खुर्ची रिकामी' ही उषा मेहतांच्या उत्कृष्ट कवितांपैकी एक आहे. ती मुळातून वाचायला हवी. एका घरातली एक सकाळ चित्रमय शैलीत शब्दबद्ध झाली आहे. टेबल, खुर्ची, पडदा, कुंडीतलं रोप, बागडणारी चिमणी सारं काही तसंच - काल होतं तसंच आहे. फक्त या 'जिवंत' नेपथ्याच्या पार्श्वभूमीवर - 'ती' आज नाहीय्. तिची खुर्ची रिकामी आहे!... व्याकूळ करणारा शेवट वाचकाला सुन्न करून जातो.

काही कविता, कविता निर्मितीच्या प्रक्रियेविषयी आहेत. विजया राजाध्यक्षांनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे - 'या संग्रहातील कवितांची भूमी म्हणजे प्रखर वास्तव, या वास्तवात होरपळणारी माणसं, विशेषत: स्त्रिया. कोणतीही वास्तववादी किंवा स्त्री-वादी भूमिका न घेता कवयित्री ठामपणे या भूमीवर उभी आहे, या वास्तवाचे काटेरी स्वरूप न्याहाळते आहे आणि तेही काहीशा अलिप्तपणे. अंतर्हृदयात करुणा आहे, भय आहे, चिंता आहे, आणि चीडही आहे. पण या भावनांना तोलून धरणारा, हे चित्र कधीतरी बदलेल, असा दिलासाही आहे.'

काटेसावर (कवितासंग्रह)
कवयित्री : उषा मेहता, **मुखपृष्ठ :** मिलिंद मुळीक
प्रकाशक : ग्रंथाली प्रकाशन
पृष्ठं : १००, **किंमत :** १२५ रु.

'अज्ञात' शरद जोशी

■ भक्ती प्रभुदेसाई

'शरद जोशी : शोध एका अस्वस्थ कल्लोळाचा' या पुस्तकातून वसुंधरा काशीकर-भागवत यांनी शरद जोशींच्या व्यक्तिमत्त्वाचा अंतर्बाह्य शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकरी नेते म्हणून शरद जोशींचे कार्य सर्वश्रुत आहेच. परंतु केवळ त्यांच्या कार्याचा आढावा घेणं हा या पुस्तकाचा हेतू नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील लेखिकेला खुणावणारं अद्वितीयत्त्व, त्यांनी केलेल्या कार्यामागील आणि त्यांच्या जगण्यामागील त्यांची मनोभूमी नेमकी कशी होती, हा शोध आपल्याला यात दिसतो. त्यांची अज्ञात बाजू आपल्यासमोर एखाद्या कॅलिडिस्कोपसारखी उलगडत जाते .

शरद जोशी खऱ्या अर्थानं स्वत:वर प्रयोग करणारे वैज्ञानिक होते. त्या प्रयोगासाठी वाट्टेल ती किंमत देण्याची त्यांची तयारीही होती आणि त्यांनी ती दिलीही. अनेक प्रश्नांचा शोध घेणारी त्यांची मनोभूमी लेखिकेला एका अस्वस्थ कल्लोळाप्रमाणे वाटते. हे पुस्तक वाचत असताना लेखिकेच्या मनातील अनेक प्रश्नांचा कोलाहल आपल्याला जाणवतो. त्यांचा सहवास म्हणजे लेखिकेला एक श्रीमंत संवादाची जागा वाटते. त्यांच्या प्रति असणाऱ्या कृतज्ञतेच्या भावनेतून हा शोध लेखिका घेते. शरद जोशींच्या जाण्याने कधीही भरून न निघणारी पोकळी अनुभवत असताना त्यांच्या १८ वर्षांच्या प्रदीर्घ सहवासातील अनेक आठवणी झरझर कागदावर उतरू लागतात आणि त्यांच्या सहवासातील अनेक संवादक्षण आपल्यासमोर मूर्त होतात. शरद जोशी यांचा सहवास, त्यांच्याशी वेळोवेळी झालेली चर्चा-संवाद हा सर्व ऐवज आणि त्यांच्या जगण्याविषयीचे आणि कार्याविषयीचे चिंतन या सर्वांतून हे पुस्तक साकार झालेले आहे. प्रत्येक लेख वाचत असताना तरलता जशी वारंवार जाणवते तसेच तटस्थपणे केलेले विश्लेषणही. त्यामुळे हे लेखन एकसुरी, एकांगी किंवा केवळ स्तुती करणारा आरतीसंग्रह होत नाही. अनुक्रमणिकेतील शीर्षकांपासून या पुस्तकाचे वेगळेपण नजरेत भरते. शरद जोशींकडे पाहत असताना मनात येणाऱ्या अनेक प्रश्नांचे प्रांजल निवेदन आहे. आपल्या परीने त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्नही आहे. दरवेळी ती उत्तरे सापडलेली आहेत असेही नाही. परंतु शरद जोशींच्या अस्वस्थतेचा, त्यांच्या जीवनशोधाचा स्वत:च्या नजरेतून लेखिकेने घेतलेला शोध नक्कीच महत्त्वाचा ठरतो. कारण तो शोध केवळ शरद जोशींचा न राहता, एका माणसाला पडणाऱ्या अनेक मूलभूत प्रश्नांचा आहे. शरद जोशी त्यातून जसे उलगडत जातात, तसे ते प्रश्न आपल्याही आत आत जिव्हारी लागतात. त्या प्रश्नांची उत्तरे केवळ मनातल्या मनात देतानाही धाप लागते आणि इथे शरद जोशींच्या अद्वितीयत्त्वाची जाणीव आपल्याला होते. पण लेखिका मात्र आपल्या मनात केवळ त्यांच्याविषयीचा आदर निर्माण करून थांबत नाही तर आपल्यालाही त्या प्रश्नांच्या कोलाहलात उतरवून स्वत:ला तासून बघायला भाग पाडते. लेखिकेचा स्वत:चा हा आतून ढवळून निघण्याचा प्रवास आपण सतत अनुभवत राहतो.

शरद जोशी यांनी युनोमधली प्रतिष्ठा आणि सुखासीनतेची नोकरी सोडून, संपूर्ण कुटुंबाच्या भावनांचा त्याग भारतातील गरिबीचं मूळ शोधण्यासाठी केला होता. त्यांच्या कौटुंबिक जीवनाला पुढे प्राप्त झालेली शोकांतिकेची किनार, त्यांचा एकटेपणा आपल्याला सुन्न करून जातो. 'त्याग म्हणजे रूपया-पैशांचा नसतो. त्याग अनेक दाहक क्षणांत गुंतलेला असतो', अशा त्यांच्याच शब्दांतून त्याची तीव्रता आपल्याला जाणवते. यासंदर्भात लिहिताना शरद जोशींनी आपल्या कुटुंबियांवर अन्याय तर नाही केला ना, हा विचार लेखिकेच्या मनात उठतो आणि 'बुद्ध आई असते, तर घर सोडून जाऊ शकले असते का?' हा लेखिकेला पडलेला प्रश्न नक्कीच मार्मिक वाटतो.

हे पुस्तक म्हणजे रूढार्थाने शरद जोशी यांचे चरित्र नाही. विविध विषयांना वाहिलेले अठरा लेख या पुस्तकात समाविष्ट आहेत. आणि त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व वाचकांपुढे साकार होते. 'पुस्तकं आणि शरद जोशी' आणि 'विचारवंत लेखक' या दोन लेखांतून त्यांच्या ग्रंथांची मौलिकता आपल्याला कळते. 'ध्येय, प्रेम, आशा ह्यांची होतसे का कधी पूर्ती?' हा लेख स्त्री-पुरूषविषयक चिंतनावरील लेख आहे. 'योगदान' या लेखातून त्यांच्या कार्याचा आणि वैशिष्ट्याचा आढावा घेतला आहे. त्यांची 'स्वातंत्र्याची' संकल्पना 'ते स्वातंत्र्य न खरे' या लेखात विस्तृत वाचायला मिळते. 'गेले द्यायचे राहून' हा लेख शरद जोशींनी आपल्याला आयुष्यात काय दिलं, ते स्वत:त आत डोकावून सांगणारा लेखिकेचा सुंदर लेख आहे.

शरद जोशी आणि वसुंधरा यांच्यातील संवाद म्हणजे या पुस्तकाचं एक महत्त्वाचं बलस्थान म्हणता येईल. या संवादाने, चर्चेने अनेक विषयांना स्पर्श केला आहे. यासंदर्भात शेतकरी आंदोलन, ते आंदोलन मागे घेण्यामागची त्यांची भूमिका; प्रेम, करुणा, संवेदनशीलता, चिंतनशीलता; मानवी आयुष्यातील भयाची भावना असे कित्येक विषय सांगता येतील.

'शरद जोशी : शोध एका अस्वस्थ कल्लोळाचा' या पुस्तकातून मात्र रस्त्यावर संघर्ष करणाऱ्या आक्रमक नेत्याच्या आंतरिक मनातला माणूस आपल्याला भेटतो.

शरद जोशी - शोध एका अस्वस्थ कल्लोळाचा
लेखिका : वसुंधरा काशीकर-भागवत
मुखपृष्ठ : शेखर गोडबोले-राजू देशपांडे
प्रकाशक : राजहंस प्रकाशन, पुणे
पृष्ठं : १५३, किंमत : २०० रु.

PUNE MUNICIPAL CORPORATION
Shivajinagar, Pune 411 005

NOTIFICATION

EXPRESSION OF INTEREST for Appointment of System Integrator to Design, Implement and Maintain Integrated Solid Waste Management System

The Pune Municipal Corporation invites reputed firms to express interest towards EoI for Appointment of System Integrator to Design, Implement and Maintain Integrated Solid Waste Management System. The EoI is available on the website http://punecorporation.org

Schedule of Bidding Process

Availability of EoI : document	09.12.2016 (Downloadable from website: www.punecorporation.org)
Last date & time for receipt of Pre Bid Queries:	14.12.2016
Pre-Bid Meeting	15.12.2016
Last date & time for receipt of EoI:	23.12.2016, 03.00 PM (Through Speed/Registered post/Courier only. No drop box facility available)
Place of Submission of EoI:	IT HoD 2nd Floor, Sawarkar Building, Near Bal Gandharv Shivajinagar, Pune 411 005,
Date & Time of opening of EoI:	23.12.2016, 05.00 PM
far further information:	info@punecorporation.org

Municipal Commissioner,
Pune Municipal Corporation,
Shivajinagar, Pune.

Advt No. 1/637, dt. 9.12.2016

गिर्यारोहणातील अस्सल शिलेदार

गिरीभ्रमण किंवा गिर्यारोहणाची आवड अनेकांना असते. प्रत्येकजण आपापल्या परीने ती जोपासत असतो. मात्र गिरीभ्रमण काय किंवा गिर्यारोहण काय, ते मुख्यत: समूहाने केलं जातं. कारण यात समूहाची साथ असणं खूप गरजेचं असतं. किंबहुना गिरीभ्रमण आणि गिर्यरोहण हे सांघिक प्रकारच आहेत. एकमेकांच्या मदतीशिवाय, आधाराशिवाय ठरवलेला टप्पा पार करणं, इते महाकठीण काम आहे. अन् तरीही कधी कधी काही 'वेडे' एकट्यानेच गिर्यारोहण करण्याचं धाडस करतात. मग हे धाडस क्वचित कधी कुणाच्या जीववारही बेततं. पण या साहसी वेड्यांना त्याची फिकीर नसते. त्यांच्यासाठी गिर्यारोहणाची मस्तीच महत्त्वाची असते. त्यासाठी मग प्राण गेला तरी बेहत्तर! उत्तम गिर्यारोहक असलेल्या उष:प्रभा पागे यांनी लिहिलेलं 'गिरीकंदरीचे एकांडे शिलेदार' हे पुस्तक म्हणजे, अशाच गिर्यारोहक असलेल्या साहसी वेड्यांना केलेला मनस्वी सलाम आहे. हिमालय-आल्प्ससारख्या उंच पर्वतराजींत जिथे समूहाने गिर्यारोहण करणं दिव्य मानलं जातं, तिथे एकट्याने गिर्यारोहण करणं म्हणजे, महादिव्यच! पण अशाच चौदा एकांड्या शिलेदारांचा म्हणजेच गिर्यारोहकांचा वेध उष:प्रभा पागे यांनी या पुस्तकात घेतला आहे. जॉर्ज मेलरी, मॉरिस विल्सन, हरमन बुल, वॉल्टर बोनाट्टी, जेर्झी कुकुझ्का, रिनॉल्ड मेसनर, ॲलिसन हरग्रिव्हज, नाओमी उइमुरा, अनातोली बोकरिव्ह, गर्लिण्डे काल्टनबुकनर, डेव्हिड शार्प लिंकन हॉल, टामोस्लोव केसन, नाबुकाझू कुरीकी... ही या एकांड्या शिलेदारांची नावं. त्यांच्या साहसाची कथा सांगताना उष:प्रभा पागे यांनी या प्रत्येकाचं गिर्यारोहणातील कर्तृत्व सांगितलंच आहे; परंतु ते सांगताना त्यातलं नाट्यही नेमकं पकडलंय. त्यामुळे या एकांड्या शिलेदारांच्या गिर्यारोहणाच्या कथा वाचताना आपणही त्यांच्याबरोबर मोहीमेवर जातो आणि घरबसल्या गिर्यारोहणाचा आनंद मिळवतो.

गिरीकंदरीचे एकांडे शिलेदार
लेखक : उष:प्रभा पागे
मुखपृष्ठ : पराग कुलकर्णी
प्रकाशक : मॅजेस्टिक पब्लिकेशन
पृष्ठं : १२०
किंमत : ३०० रु.

कवी अनुवादिती कविता

विविध देशांतील, भाषांतील कवींनी एकमेकांच्या कवितांचा अनुवाद करण्याचा उपक्रम नुकताच मुंबईत मॅक्समुलर भवनात पार पडला. साहित्यिक-सांस्कृतिक देवाणघेवाण करणाऱ्या या उपक्रमाविषयी...

■ प्रफुल्ल शिलेदार

उपोद्घात :

'गोएथे इन्स्टिट्युट' ही जर्मन भाषेचा प्रसार करण्याकरिता प्रतिबद्ध असलेली संस्था गेली साठ वर्षे भारतात आपले काम नेमस्तपणे करीत आहे. जर्मन भाषेशी आणि जर्मनीशी प्राथमिक संपर्काचा तो अनेकांचा एक बिंदू आहे. मात्र गेल्या साठ वर्षांच्या इतिहासात त्यांनी प्रथमच 'पोएट्स ट्रान्सलेटिंग पोएट्स' हा दक्षिण आशियातील वीस भाषांमधील कवींच्या कवितेच्या अनुवादाचा दोन वर्षांचा मोठा कार्यक्रम आखला. दक्षिण आशियातील देशांमध्ये समकालीन साहित्याचे आपापसात काही नियमित भाषिक आदानप्रदान होते आहे असे दिसत नाही. एकाच उपखंडातील देश एकमेकांच्या समकालीन साहित्यिक विश्वाबद्दल अनभिज्ञ आहेत. या देशांची कवितेच्या अनुवादाच्या माध्यमातून एक साखळी जोडण्याचा अभिनंदनीय प्रयत्न गोएथे इन्स्टिट्युटने केला. २५ ते २७ नोव्हेंबरला मुंबईत झालेला कविता महोत्सव पाहता तो बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाला असे म्हणता येईल. भारत, पाकिस्तान, बांगला देश, श्रीलंका आणि जर्मनी या देशातील ५१ कवींनी मिळून एकमेकांच्या भाषेतील कवितांचा अनुवाद साजरा केला. युरोपातील एका परदेशी संस्थेला स्वभाषेच्या संवर्धनासाठी ही कल्पना सुचते आणि शिस्तशीरपणे ती दक्षिण आशियात हा कार्यक्रम राबवते, ही आपल्या देशी संस्थांकरिता देखील अनुकरणीय गोष्ट आहे.

दृश्य १ : मॅक्स म्युलर भवनच्या लायब्ररीतील दुपारचे सत्र. चित्रकार अतुल दोडिया आपल्या गाजलेल्या 'द अँटलर अन्थोलॉजी' या मालिकेतील कलाकृतींच्या स्लाइड्स दाखवत या मालिकेमागील प्रेरणा समजावून सांगत होते. आपली मातृभाषा गुजराथीतील महत्त्वाच्या कवींच्या बारा कवितांवरील त्यांचे काम त्यांनी कसे केले ते स्लाइडच्या साहाय्याने सांगत होते. या मालिकेतील मूळ चित्रे पाहण्याची देखील तिथेच संधी होती. कुठे चारकोल वापरले, कुठे रंग, आणि कुठले माध्यम वापरले हे सांगताना त्या कवितेतील जाणवलेले कथ्य त्यांनी मूळ कवितेच्या गुजराथी लिपीतील अक्षरलेखनाच्या माध्यमातून कसे व्यक्त करण्याचा प्रयत्न केला, हे ते सांगत होते. लिपीचा आणि भाषेचा आणि कवितेचा आणि कवितेतील अर्थाचा आणि त्याला आविष्कृत करणाऱ्या त्या कॅनव्हासचा काय संबंध असू शकेल, या विचारात मी गुरफटून जातो. काही चीनी कवितांवर देखील त्यांनी काम केले. चिनी भाषा येत नसल्याने अर्थापासून सुटी अशी लिपीची शुद्ध चिन्हे त्या आविष्कारात गवसली असेही ते सांगतात.

दृष्य २ : जवळ जवळ तीन वर्षांनी गेर्हार्ड फॉकनर या जर्मन कवीशी पुन्हा एकदा भेट झाली. या आधी पूर्व युरोपातील 'आर्स पोएतिका' या कविता महोत्सवात तो भेटला तेव्हा त्याच्या कविता माझ्या लक्षात राहिल्या ते त्याच्या कवितांवरील व्हिज्युअल्समुळे. १९८१ साली आलेल्या पहिल्या संग्रहापासून तो समकालीन जर्मन कवितेतला महत्त्वाचा कवी मानला जातो. बर्लिन शहरात राहणारा हा कवी बर्लिन भिंत तोडली गेली त्या क्षणाचा साक्षीदार होता. शहरीकरण, रस्ते, गर्दी, बुलडोझर सारखे यांत्रिक पक्षी मोठमोठ्या इमारती आपल्या चोचीने कुरतडून खात आहेत, अशी त्याच्या कवितेतली दृश्ये मनात घर करून होती. गेर्हार्ड म्हणतो, मी कविता लिहून झाल्यानंतर व्हिडिओग्राफर सोबत काम करतो. त्यानंतर ही व्हिज्युअल्स बनतात. व्हिडिओग्राफी हा देखील क्रिएटीव्ह प्रोसेसचाच एक भाग असतो.

दृश्य ३ : श्रीलंकेतील कवी सोपा आपले गृहयुद्धातील अनुभव सांगताना आपले स्वत:च्या देशातील विस्थापन आपल्या मनाच्या खोल तळाशी कसे रुतून बसले आहे, हे सांगत होते तर काश्मिरी कवयित्री नसीम शफाई काश्मिरातील हरवलेल्या घराच्या भेदक हाका अजूनही अस्वस्थ करत आहेत, हे दु:ख वाटून घेत होत्या. पाकिस्तानातील कवी व्हिसा नाकारल्याने पोहोचू शकले नाहीत; नाही तर त्यांच्याही विस्थापनाच्या दु:खाचा पोत नजरेस आला असता. सीमारेषा तुटत असताना, बदलत असताना, धगधगत असताना कवितालेखनातून आणि अभिव्यक्तीच्या अनुवादातून हे दु:ख काही प्रमाणात वाटून घेता येऊ शकते काय ?

दृश्य ४ : फेस्टिवल व्हेन्यू : एडवर्ड थिएटर, काळबादेवी : सोबत मंगलेश डबराल आणि कुमार अंबुज. अलिफ या काश्मिरी कवी गायकासोबत उलरिक अल्म्युत ही जर्मन कवयित्री आणि सोबत वेस्टर्न बँड आणि उत्तम साउंड. उलरिक मंगलेशजींच्या 'संगतकार' या गाजलेल्या कवितेच्या जर्मन अनुवादाचे वाचन करते. अलिफ त्या वाचनाला पार्श्वगायनासाठी रागाचे आलाप आळवत राहतो. जर्मन शब्दांचे कुंपण ओलांडून कवितेचा भाव आपल्यापर्यंत पोहोचतो. जर्मन श्रोत्यांना तर ती कविता फक्त शब्द-ध्वनीतूनच नाही तर एका त्रिमित ध्वनिसंयोजनातून भिडते. आधी ही कविता मी वाचलेली असल्याने मूळ कविता मनात निनादत राहते.

दृश्य ५ : वर्डस्केप : सर्जनशील साउंड इंजिनीअर उदित दुसेजाने केलेले साउंड इंस्टॉलेशन (ध्वनी मांडणीशिल्प म्हणू या आपल्या भाषेत). वीस भाषांमधील कवींच्या कवितांचे आणि त्यांच्या अनुवादाच्या वाचनाचे ध्वनी मांडणीशिल्प. कवींच्या आवाजातील कविता हळूहळू उमलत जातात. एका भाषेतील ओळ दुसऱ्या भाषेत विरघळत जाते. ध्वनींचे लोकेशन अतिशय विचारपूर्वक केलेले. त्यात कुठलाही कृत्रिम ध्वनी नाही. त्यातून एक वेगळाच भाषिक परिणाम साधला जातो. सलग एकवीस मिनिटांचा श्राव्य अनुभव. उदित दुसेजाचे असेच मला आवडलेले ध्वनी मांडणीशिल्प म्हणजे 'सेन्स ऑफ स्पेस'. त्यातही तो अवकाशाच्या मर्यादा ध्वनींच्या आधारे शोधू पाहतो.

दृश्य ६ : झेब्रा फिल्मसचे डिरेक्टर थोमास वोल्फहार्ट कवितेवरील शॉर्ट फिल्म्स आवर्जून दाखवतात. अमर कंवर त्यांची फिल्म 'द नाइट ऑफ प्रोफेसी' घेऊन आलेत. कवितांवरील ही फिल्म स्वत:च एक कविता असते.

दृश्य ७ : गणेश देवी 'पॉलिटिक्स ऑफ लँग्वेज' या विषयावर एक तास गंभीरपणे आपले विचार सूत्रबद्धपणे मांडत गेल्या दोन शतकांतील आपल्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक स्खलनातून होत असलेल्या भाषांच्या विनाशाचे विदारक चित्र पुढे मांडतात. कमजोर ठरलेल्या भाषांचा विनाश हळूहळू आपल्याला एका अरुंद भाषिक कोपऱ्यात आणून ठेवणार याची भयावह जाणीव होत जाते.

उपसंहार :

कविता मुळात लिखित संहितेत असते. ती ध्वनीच्या आणि दृश्यांच्या साहाय्याने अधिक परिणामकारक पद्धतीने समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहोचू शकेल काय? अशा कवितेकरिता काही विशिष्ट भावांचीच कविता असणे गरजेचे आहे काय? म्हणजे अरुण कोलटकर किंवा नामदेव ढसाळ यांच्या कवितांचे बहुमाध्यम रूप कसे असू शकेल? कवी कवितेकरिता नव्या माध्यमांचा शोध घेत आहेत काय? आपल्या भाषेत अशा प्रकारे गंभीर आणि लिरिकल नसलेल्या कवितेच्या दृक-श्राव्य सादरीकरणाची परंपरा नाही. गेयता असल्याशिवाय कवितेची ध्वनिसोबत सांगड घातली जात नाही. आणि गेय कवितेचे तर चलनी गाण्यात र